# संविधान शपथ
## (एका व्यक्तीने म्हणायची, इतरांनी रिपीट करायची)

मी संविधानामध्ये दिलेल्या मूल्यांचे पालन करेन.
मी कोणत्याही व्यक्तीचा द्वेष करणार नाही.
मी लोकांमध्ये एकता-बंधुभाव वाढवण्यासाठी प्रयत्न करेन.
मी महिलांचा आदर करेन आणि कुणालाही महिलांचा अपमान करू देणार नाही.
मी वैज्ञानिक दृष्टिकोन आणि मानवतावाद यांचा प्रसार करेन.
मी सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण करेन व हिंसाचाराचा निग्रहपूर्वक त्याग करेन.
संविधानाचे पालन करणे हीच खरी देशभक्ती आहे, असे मी मानतो.
त्यामुळे, संविधानाचे पालन करून मी खरा देशभक्त बनेन.
जय हिंद! जय संविधान!